कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम मधील भूसंपादित जमिनीच्या बाबतीत शेतकरी दर्जा विषयक तरतुदीतील सुधारणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः टिएनसी-०२/२०१३/प्र.क्र.५४/ज-१
जागतिक व्यापर केंद्र, सेंटर-वन इमारत
कफ परेड,मुंबई-४०० ००५
**दिनांक : ३० मे, २०१४**

**वाचा: -**

१) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम-६३
२) हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५० चे कलम-४७
३) मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम १९५८ चे कलम -८९
४) विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रमांक १६६/बी, दिनांक २७.०५.२०१४
५) महाराष्ट्र शासन राजपत्र (असाधारण) भाग-चार व भाग-आठ, दिनांक:- २७ मे, २०१४

**शासन परिपत्रक:-**

मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-६३ मध्ये, हैद्राबाद कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० च्या कलम-४७ मध्ये व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८ च्या कलम-८९ मधील " शेतकरी " या शब्दप्रयोगात, **"ज्या व्यक्तीची जमीन कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केली असेल आणि अशा संपादनाच्या परिणामी ती अशा संपादनाच्या दिनांकापासून भूमिहिन झालेली असेल अशी कोणतीही व्यक्ती आणि तिचे वारस** " असा समावेश करण्याचे विधेयक विधानमंडळाने २०११ मध्ये संमत केले असून, सदर विधेयकाच्या प्रती मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयामार्फत मा. राष्ट्रपती महोदयांच्या मान्यतेसाठी केंद्र शासनास पाठविण्यात आले होते. त्यास मा.राष्ट्रपती महोदयांची दिनांक ०९.०५.२०१४ रोजी संमती प्राप्त झाली आहे. त्याअनुषंगाने विधी व न्याय विभागाने सन २०१४ चा अधिनियम क्रमांक १० हा दिनांक २७.०५.२०१४ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द केलेला आहे. **सदर शासन राजपत्राची प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.**

**०२.** सन २०१४ चा अधिनियम क्रमांक-१० अन्वये मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-६३ मध्ये, हैद्राबाद कुळवहिवाट आणि शेतजमीन अधिनियम, १९५० च्या कलम-४७ मध्ये व मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग) अधिनियम, १९५८ च्या कलम-८९, या कलमांच्या पोटकलम-(१) च्या स्पष्टीकरणाऍवजी पुढील स्पष्टीकरण दाखल करण्यात आले आहे.

**स्पष्टीकरण**:- "शेतकरी " या शब्दप्रयोगात, "ज्या व्यक्तीची जमीन कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित केली असेल आणि अशा संपादनाच्या परिणामी ती अशा संपादनाच्या दिनांकापासून भूमिहिन झालेली असेल अशी कोणतीही व्यक्ती आणि तिचे वारस यांचा समावेश होईल."

०३. सदर सुधारित तरतुदीप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच या सुधारणेला सर्व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१४०५३०१५१७०१२५१९** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shivraj Shrikant Patil

Digitally signed by Shivraj Shrikant Patil
DN: CN = Shivraj Shrikant Patil, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2014.05.30 16:25:01 +05'30'

एस.एस.पाटील
शासनाचे उप सचिव

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव./वि.का.अ., मंत्रालय, मुंबई-३२,
४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव. वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला, मुंबई-०५,
५. महालेखापरीक्षक (लेखा/अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
६. महालेखा परिक्षक (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर
७. मा.अ.मु.स.(महसूल) यांचे वि.का.अ.,महसूल व वन विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर,३२ वा मजला,मुंबई.
८. प्रधान सचिव (विधी व परामर्शी) यांचे स्वीय सहायक, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
९. प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन,मुंबई-३२
१०. सर्व मंत्रालयीन विभाग
११.सर्व विभागीय आयुक्त,

१२.जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.सर्व जिल्हाधिकारी,/ सर्व अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
१४.सहसचिव/उपसचिव, महसूल व वन विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला, मुंबई-०५,
१५.उप सचिव (ब- शाखा), विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई-३२
१६.सर्व उप विभागीय अधिकारी/ सर्व तहसिलदार
१७. “ज” समूहातील, सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग मुंबई
१८. कक्ष अधिकारी/ल-१ सेल, महसूल व वन विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, ३२ वा मजला, मुंबई
१९.निवडनस्ती(ज-१)